# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 19 October 2024

Time 01.00 to 01.05 PM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १९ ऑक्टोबर २०२४ दुपारी १.०० वा.**

****

महाराष्ट्र काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या प्रमुख उपस्थितीत, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या अध्यक्षतेखाली महाविकास आघाडीच्या जागा वाटपाची जबाबदारी असलेल्या काँग्रेस नेत्यांची बैठक मुंबईतल्या टिळक भवन इथं आज होत आहे. या बैठकीनंतर याच ठिकाणी वाजता काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या उपस्थितीत विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसनं नियुक्त केलेल्या वरिष्ठ निरीक्षक आणि समन्वयकांची बैठक होणार आहे. दरम्यान, चेन्नीथला यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची आज मातोश्री या निवासस्थानी भेट घेतली. महाविकास आघाडीमध्ये कोणतेही मतभेद नाहीत. उद्धव ठाकरे यांची प्रकृती ठीक नव्हती म्हणून भेट घेतल्याचं त्यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितलं.

****

विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसने जाहीरनामा समिती स्थापन केली असून अध्यक्षपदी दिलीप वळसे-पाटील यांची तर निमंत्रक म्हणून पक्षाचे सरचिटणीस शिवाजीराव गर्जे यांची निवड प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी केली आहे.

या जाहीरनामा समितीमध्ये पक्षाचे नेते धनंजय मुंडे, अनिल पाटील, नरहरी झिरवाळ, आदिती तटकरे, समीर भुजबळ, आमदार इद्रीस नायकवडी, प्रवक्ते अविनाश आदिक, रुपाली चाकणकर यांच्यासह अन्य पदाधिकाऱ्यांचा समावेश आहे.

****

विधानसभा निवडणुकीसाठीची आदर्श आचारसंहिता लागू झाल्यापासून १५ ते १८ ऑक्टोबर या कालावधीत राज्यभरात सी-व्हिजिल ॲपवर एकूण ४२० तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, त्यापैकी ४१४ तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली काढण्यात

आल्या, यामध्ये ठाणे जिल्ह्यातल्या सर्वात जास्त तक्रारींचं निवारण करण्यात आलं आहे. याकाळात राज्य शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या बेकायदा पैसे, दारू, ड्रग्ज आणि मौल्यवान धातू आदी बाबतीत कोट्यावधी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

****

मतदान केंद्रावर सुविधा उपलब्ध करणं, मतदारांमध्ये जाणीव जागृती निर्माण करुन मतदानाची टक्केवारी वाढवणं, अशा निवडणूक प्रक्रियेत शिक्षकांची महत्त्वाची भूमिका आहे, असं छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी म्हटलं आहे. जिल्ह्यात मतदान प्रक्रियेमध्ये जास्तीत जास्त मतदान केंद्र शाळेतच असल्यामुळे शाळेमध्ये असणाऱ्या सर्व सुविधांचा आढावा जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी घेतला, त्यावेळी काल ते बोलत होते. निवडणूक प्रक्रियेत सहभागी असणाऱ्या शिक्षक आणि अधिकारी कर्मचाऱ्यांनी निवडणूक कालावधीत मुख्यालय सोडू नये. याबाबत शिक्षण विभागाने खबरदारी घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी यावेळी दिले.

****

दिवाळीनिमित्त राज्य परिवहन महामंडळातर्फे पुणे विभागातून राज्याच्या विविध भागात जाण्यासाठी ५०४ जादा बसगाड्यांचं नियोजन करण्यात आलं आहे . २७ ते ३१ ऑक्टोबरपर्यंत शिवाजीनगर, स्वारगेट, पिंपरी चिंचवड बसस्थानकातून या गाड्या सोडण्यात येणार आहेत.

****

मुंबईतल्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर गेल्या १६ ते १८ तारखेदरम्यान प्रवाशांनी सामानात, शरीरात आणि कचरापेटीत लपवून आणलेलं १ कोटी ७० लाख रुपये किमतीचं २ किलो ४२७ ग्रॅम सोनं आणि ४२ लाख १४ हजार रुपये किमतीचे महागडे ७ फोन विमानतळ गुप्तचर आणि टेहळणी विभागानं जप्त केले आहेत. केनिया, जेद्दाह, दुबई आदी देशांमधून हे सर्व साहित्य बेकायदेशीर पद्धतीनं विमानानं मुंबईत आणण्यात आलं होतं.

****

जळगांव शहरासह जिल्ह्यातल्या बहुतांश भागात परतीच्या पावसानं काल संध्याकाळी आणि मध्य रात्री पुन्हा एकदा जोरदार हजेरी लावली. विजांच्या कडकडाटांसह झालेल्या वादळी पावसामुळं वेचणीवर आलेला कापूस, मका आणि कडधान्याचं अतोनात नुकसान झालं आहे. पाचोरा तालुक्यातल्या नगरदेवळा इथं

काल अंगावर वीज पडून ६५ वर्षीय पांडुरंग त्र्यंबक महाजन यांचा मृत्यू झाला; तर दुसऱ्या घटनेत वीज पडून बैल आणि दोन वासरं ठार झाली. त्यापूर्वी अग्नावती आणि गडद नदीला सोमवारी आलेल्या पुरात तिघांचा बडून मृत्यू झाला होता. परतीच्या प्रवासात गेल्या सहा दिवसात जळगाव जिल्ह्यात झालेला हा चौथा मृत्यू आहे.

****

भारत आणि न्यझीलंड यांच्यात सुरु असलेल्या पहिल्या कसोटीतील आज चौथ्या दिवशीचा खेळ पावसामुळं थांबला आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा, भारताच्या दुसऱ्या डावात ३ गडी बाद ३४४ धावा झाल्या आहेत. सर्फराज खान यानं शतक साजर करत १२५ धावांवर ऋषभ पंतनं ५३ धावांवर नाबाद आहेत. यापूर्वी भारतीय संघाचा पहिला डाव ४६ धावांवर आटोपला तर न्युझीलंडनं पहिल्या डावात सर्वबाद ४०२ धावा केल्या होत्या.

****